**सक्सेशन केस क्र.३८७/२०२२**
**मनोहर वि. कोणीही नाही**
**निशाणी ९**

**<u>अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.१ चा पूढील सरतपास श्री. प्रशांत खेवले विधीज्ञ यांचे मार्फत शपथेवर सुरु</u>**

माझे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.९ आता मला दाखविले असता त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

१९. सदर प्रकरणाची जाहीर नोटीस दैनिक पुण्यनगरी मध्ये देण्यात आली होती. वृत्तपत्राची प्रत दाखल केली आहे. त्यास **निशाणी क्र.१०** देण्यात येते. अर्जदार क्र.२ ते ७ यांनी माझ्या नावे करुन दिलेले मुखत्यारपत्र दाखल केले आहे. त्यावर सर्व अर्जदारांच्या सहया आहेत, त्या मी ओळखतो. त्यास **निशाणी क्र.११** देण्यात येते. मी माझ्या वडिलांचे व आईचे मुळ मृत्यु प्रमाणपत्र दाखल केले आहे. त्यांना **निशाणी क्र.१२ व १३** देण्यात येते. बँक ऑफ इंडियाचे मुळ पासबुक दाखल केले आहे. त्यास **निशाणी क्र.१४** देण्यात येते. शेतीचा सातबारा उतारा दाखल केला आहे. त्यास **निशाणी क्र.१५** देण्यात येते. करआकारणी प्रत दाखल केली आहे. त्यास **निशाणी क्र.१६** देण्यात येते. जमीनीचे मुल्यांकन पत्रक दाखल केले आहे. त्यास **निशाणी क्र.१७** देण्यात येते. माझ्या आईचे व सर्व अर्जदारांचे आधारकार्डची व्हेरीफाईड प्रत दाखल केले आहेत. त्यांना **निशाणी क्र.१८ ते २५** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्वीकृत** **माझे समक्ष**

नागपूर (सि. म. पाडोळीकर )
दिनांक ०८.१२.२०२२ १३वे सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर)
नागपूर